Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# होळकर कुलभूषण - गौतमीबाई होळकर,

**डॉ. सतिलाल आ. कन्नोर,** इतिहास विभाग, श्री.शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे, भाऊसाहेब ना. स.पाटील साहित्य आणि मु. फी. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे

**प्रस्तावना**

भारताच्या मध्ययुगीन कालखंडातील इतिहासात मराठयांचा इतिहास एक महत्त्वाचे पर्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६७४ मध्ये राज्याभिषेक करुन लोककल्याणास्तव स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराजानंतर छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, छत्रपती शांहू यांचे महत्त्वाचे नेतृत्व स्वराज्याच्या उभारणीसाठी लाभले. पुढील काळात स्वराज्य विस्तारासाठी मराठा मंडळानेही मोलाचा हातभार लावला. पेशवे बाळाजी विश्वनाथ भट, थोरले बाजीराव पेशवे, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब, पेशवे थोरले माधवराव यांच्या काळापासून ते तिसऱ्या पानिपतच्या युध्दापर्यंत मराठा राज्य हे विस्तारातील प्रमुख राज्य होते. १८ व्या शतकामध्ये मराठयांच्या सत्तेचा मोठया प्रमाणात विस्तार झाला. विशेषत: पेशवा थोरले बाजीराव यांच्या काळात मराठा राज्य भारतातील प्रमुख सत्तांपैकी सर्वोच्च स्थानी होते. या राज्य विस्ताराला शिवकाळापासून अनेक सरदार घराण्यांनी मोलाची साथ दिली. तशी परंपराच स्वराज्य रक्षणार्थ व विस्तारासाठी लाभली आहे. या स्वराज्य विस्तारामध्ये 'मल्हारराव होळकर' यांचे नावही प्रामुख्याने दिसते. 'होळकर' घराण्याने मल्हारराव होळकर यांच्या वेळेपासूनच मराठा राज्यविस्तारात मोलाची कामगिरी केली आहे.

मल्हारराव होळकर यांच्या कर्तृत्वाचा कालखंड इ.स. १७२० ते १७६६ असा प्रदीर्घ आहे. त्यांनी पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या काळापासून ते पेशवे थोरले माधवराव यांच्या काळापर्यंत मराठा राज्याचा काळ पाहिला आहे. इतका मोठा काळ कार्यरत राहणारे अशी प्रतिमा व कार्य कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे व्यक्तिमत्त्व मराठा राज्यात क्वचितच दिसते. एका सामान्य कुटूंबात जन्म घेवून स्वकर्तृत्वावर स्वत:ची प्रतिमा व कार्य करणारे मल्हारराव होळकर मराठा राज्याचे आधारस्तंभ होते. मल्हारराव होळकर हे इ.स.१७२५ पासून ते इ.स.१७६६ या प्रदिर्घ काळात मराठा राज्यविस्तार व युद्ध- मोहिमांसाठी आपल्या इंदोर या प्रक्षेत्रापासून बाहेर राहत त्यावेळी त्यांच्या संपूर्ण गैरहजेरीच्या काळात सरंजामशाहीचे व खासगीचे संचालन त्यांच्या पत्नी गौतमीबाई यांनी केले. काळाच्या प्रवाहात गौतमाबाई यांच्या कार्याची दखल इतिहासाने घेतली नाही त्यांची त्याग आणि संयमीवृतीने मल्हारराव होळकर आणि अहिल्यादेवी होळकर ही दोन महान विभूती निर्माण झालेल्या दिसतात. त्यांच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे-

**संबोध शब्द**: खासगी अधिकार,सरंजाम, मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, पानिपत.

**संशोधनाचा उद्देश**

१. मराठ्यांच्या इतिहासातील गौतमाबाई होळकर यांच्या स्वतंत्र कार्याचा अभ्यास करणे.
२. सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या उत्तर भारतातील मोहिमांच्या मदतीत गौतमाबाई यांच्या अनमोल मदतीचा इतिहास प्रकाशात आणणे.
३. गौतमाबाई यांना मिळालेल्या खासगी अधिकारांच्या योगदानाचे चित्रण करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

४. गौतमाबाई आणि सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या प्रभावशाली कार्यातूनच अहिल्यादेवी होळकरासारखे व्यक्तिमत्व घडणाच्या समकालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

१. होळकर घराणेशाहीचा इतिहास हा स्त्री-पुरुष समानतेचा इतिहास दिसतो. मराठेशाहीच्या काळात स्त्रीयांच्या कार्याला पाठींबा देणारे एकमेव घराणे होळकर घराणे दृष्टीक्षेपात येते.

२. गौतमीबाई यांच्या राजकीय आणि धार्मिक कर्तृत्त्वातून अहिल्यादेवी होळकर हे व्यक्तीमत्व घडत गेले.

३. गौतमीबाई यांनी खासगीचा अधिकार जनकल्याण आणि समाजकार्यात वापरावयाचा पायंडा पाडला.

**संशोधनपद्धती**

ऐतिहासिक घटनांचा व वास्तव परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. विविध ज्ञानशाखेत नवीन तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी आणि जुनी तत्थे परीक्षणाची वैज्ञानिक पद्धत म्हणजे संशोधन होय. प्रस्तुत संशोधनाकरिता ऐतिहासिक, सामाजिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे. ऐतिहासिक व वर्तमान स्थितीच्या अभ्यासासाठी आंतर विद्याशाखीय दृष्टिकोनाचा आधार घेतला आहे. शिवाय मल्हारराव होळकर आणि गौतमीबाई होळकर यांच्यांशी संबधित ऐतिहासिक स्थळांना भेटी देवून वस्तुनिष्ठ लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषयप्रवेश**

भोजराज बारगळ (तळोदा) व मोहीनीबाई यांची मुलगी म्हणून गौतमाबाईचा उल्लेख ऐैतिहासीक कागदपत्रात मिळतो. गौतमाबाईचे माहेर तळोदा (जि. नंदुरबार) येथील होते. ह्या एका पराक्रमी घराण्यातील स्त्री होत्या. भोजराज हे कदमबांडेच्या सैन्यात नायक होते. इ.स.१७१९ च्या सुमारास मल्हाररावांशी त्यांचे लग्न झाले. लग्नाप्रसंगी त्यांचे वय ७ वर्षाचे होते. काही ठिकाणी त्यांच्या लग्नाप्रसंगी वय ६ वर्ष,९ महिने असे दिसते. मल्हाररावांचे वय ८ वर्षाचे होते. दोघांच्या वयातील फरक १ वर्ष ३ महिने असा दिसुन येतो. या वयात लग्न होणे हे त्या काळाला धरुन होते.

बाजीराव पेशव्यांनी मल्हाररावांच्या विनंती नुसार गौतमाबाईना तीन लक्ष उत्पन्नाचा प्रदेश/ मुलूख खाजगीकडे लावून दिला होता. इ.स.१७३४ अशी तारीख कागदपत्रात मिळते.

"खासगी व दौलत असे दोन्ही प्रथक -प्रथक कायम करुन तुमचे कुंटूब सौ।। गौतमाबाई नावे इनाम देवून सनद व कपडे पाठवले." खासगीमध्ये खालील गावे व त्यांचे उपन्न येई.

२६३००० प्रो. महेश्वर - चोळी व प्रो. इंदूर प्रो हरसोला, व प्रो. सावेर प्रो. बरलोई तालुका, प्र।। देपालपुर प्रो. तालुके हतोद, व प्रो महतपुर प्रो जगोटी व करंज माकडोन वगौर बरहू।। यांदी मंखलासीची ३६०१० दक्षिण प्रांती चांदवड प्रो गावे व अंबड प्रो कोरेगाव वगौरे मोगलाई कडील बरहु। याद २९९०१०/-

अशा प्रकारची खासगी २० जानेवारी, १७३४ रोजी गौतमाबाईना मिळाली होती. या खासगी मधून लग्नाची भेट, सावकार, व व्यापाऱ्याना कर्ज, दानधर्म, समाजकार्याची कामे, लग्न, इ. केली जात.

मल्हारराव होळकर यांना पेशव्यांकडून जो सरंजाम, सुभे मिळाले त्याचे प्रामुख्याने दोन भाग पाडण्यात आले होते.

१. खाजगी / खासगी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

२. दौलत.

**खाजगी**

मल्हारराव होळकरांना त्यांची पत्नी गौतमाबाईच्या नावे इ. स.१७३३ ला ३ लाख उत्पन्नाचा प्रदेश पेशव्यांकडुन मिळाला होता. त्यात पुढे भर पडत गेली, तो पुढे १५ लाखांवर गेला. मल्हाररावांच्या मृत्यूसमयी १६ कोटींची शिल्लक मल्हाररावांच्या खजिन्यात होती. १६ कोटीच्या द्रव्यावर व १५ लाखाच्या खाजगी मिळकतीवर गौतमाबाईची मालकी होती. पुढे हीच मालकी अहिल्याबाई होळकर यांना मिळाली. खाजगीत जी गावे होती त्याचे उत्पन्न व हिशोब, जमा, खर्च वेगळा मांडला जात असे. त्याचे हिशोब मांडण्याकरीता स्वतंत्र नोकरवर्ग होता. दौलत व खाजगी दोन्हींचे हिशोब वेगवेगळे मांडले जात प्रत्येक परगणामधून दरमणी दोन शेर या हिशोबाने नजराण्याचे उत्पन्न मिळत असे.

**दौलत**

मल्हाररावांच्या मृत्यूंसमयी दौलतीचा सरंजाम हा ९५ लाखाचा होता. त्यात राज्याच्या सोयीसाठी दौलतीचे तिन भाग केले होते.

१. सातपुडयाच्या दक्षिणेकडील प्रदेश - स्वदेश व खान्देश

२. सातपुडाच्या उत्तरेकडील प्रदेश - महेश्वरच्या लगतचा प्रदेश

३. महेश्वरच्या उत्तरेकडील भाग - यामध्ये इंदूर, तराना, व राजपूतामधील काही भाग यात-

| | | |
|---|---|---|
| आंबड | - | ४३२००० |
| राऊता | - | १३५००० |
| नंदुरबार | - | ३९४००० |
| महेश्वर | - | १७५००० |
| रामपूरा, किलाट, वगौरे | - | ७५०००० |
| रामपुरा किल्ला | - | २५४००० |
| दइफकपूर | - | २९६००० |
| जहागीररात माल्यो | - | ४८१००० |
| चांदवड | - | २५७००० |
| सुलतानपूर | - | २९५००० |
| इदाजारत | - | ४१५००० |
| रामपूरत | - | ३०५००० |
| सिरोंज | - | ३१२००० |
| सौद | - | २८६००० |
| बिजेनगर | - | ३५००० |
| हिन्दुस्थान पैकी | - | ४६७०००० |
| सामाईक वगैरे | - | ९४९२०००/- |

१८ व्या शतकाच्या सुरवातीचा विचार करता माळव्याचे वार्षीक उत्पन्न सुमारे १ कोटी रूपयेच्या आसपास होते. माळव्याची विभागणी होळकर, शिंदे, पवार यांच्यामध्ये पेशव्यानी केली होती. माळव्याचा निम्मापेक्षा जास्त प्रदेश हा मल्हाररावांना देण्यात आला होता. यात महेश्वर, इन्दुर, नेमावर, पंचमहाल,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

देपालपुर, बेटमा, सुंदरसी, नारायणगढ, रामपूरा, भानपूरा, सावेर, हासलपूर, तराना, कायथा, महिदपूर, जीरापूर, माचलपूर, पिपलोद इत्यादी भाग हे उत्तरेकडील होते. हे सर्व परगणे होळकरांच्या ताब्यात होते. दक्षिणेचा विचार करता वाफगाव, चांदवड, संगमनेर, अंबड, वेरुळ, आडगाव, इत्यादी तर खान्देशामध्ये सुल्तानपुर, नंदुरबार हे परगणे होते. नेमाडामध्ये खरगून, सनावद, बढवाह, सेंधवा, भीवनगाव, जामली, इस्लामबाग, हवेली, व आजूबाजूचे प्रदेश होते. राजपूतानामध्ये, टोंक, तोडा, रामपूरा हे परगणे होते. याशिवाय झाबुआ, जाबदा, सिरोंज, इ. प्रदेश सुध्दा मल्हाररावांच्या ताब्यात होते.

हा खासगी चा अधिकार संपूर्ण मराठयांच्या इतिहासामध्ये फक्त मल्हाररावांच्या पत्नी गौतमाबाई यांनाच प्राप्त होता. या खासगी प्राप्तामुळे गौतमाबाईना शिक्षण मिळाले. हा मल्हाररावांचा दूरदर्शीपणा व आर्थिक घटकांची जाणीव प्रत्ययास येते.

गौतमाबाईनी या खासगी च्या आधारे घृष्णेश्वर मंदिर च्या जिर्णोध्दाराचे काम केले होते. इ.स. १७३० मध्ये गौतमाबाईनी केलेल्या जिर्णोध्दाराची नोंद मंदिराच्या भिंतीवर शिलालेख रुपाने आजही पहावयास मिळते. पूढे अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराची बांधणी केलेली दिसते.

दत्ताजी शिंदे यांचा इ.स.१७६० रोजी बरारी घाटावर गिलच्यांनी वध केला, त्यावेळी जनकोजी शिंदे सह त्यांची फौज होळकरांची वाट बसले. कोठपूतळीला दोन्ही सैन्याची भेट झाली. त्यावेळी मल्हारराव होळकर यांच्या समवेत गौतमाबाई पण हजर होत्या. दत्ताजी चा वध, व जनकोजी जखमी हे ऐकताच मल्हारराव शोक करीत बसले तेव्हा गौतमाबाईनी मल्हाररावांना धिर देवुन त्यांना प्रोत्साहीत केल्याचे होळकरांची कैफियत नूसार दिसते.

'सुभेदार तुमचे वृध्दपण जाहले. शिंदे यास मूल म्हणोन अधिक काय? त्याचा तोंडचा जार वाळला नाही. तो त्यांनी एवढा पराक्रम करुन मारता-मारता मेले. एरव्ही मृत्यूलोकास आला प्राणी वाचत नाही. परंतु इहलोकी इतकी किर्ती करुन वर परलोकी साधन करणे हेच दुर्लभ, हे मूल जनकोजी शिंदे याणी एवढा पराक्रम केला. तुमचे दिवस समीप आले. तरी हिंमत धरुन मारता-मारता मरावे. हा प्रताप क्षत्रीय जातीने करावा. खेद स्त्री जातीने करावा. पुरुषास साजत नाही. प्रस्तुत जवळ जखमी व मुले व बायको आली आहेत. तरी आता जावुन भेटून त्यांचे समाधान करावे.' असे वाक्य गौतमाबाईच्या तोंडी दिले आहेत. यावर पुढे मल्हारराव म्हणतात- 'सधवा असता कोणी वौधव्याची आस्ता धरील, असे कोणीही नाही. आहेवपणे हंळदकुंकूमंडीत मरावे हीच सर्वांची आस्ता परंतु जसे पूर्वाचरण असते तसेच घ्यावे लागते. आपले पदरी कौतुक भारी.'

'तुम्ही आपले घोंगडी विणावयाचे स्वकर्म करीत असता तरी सहजच वाचावयाची आस्था धारावी, वाटा तरी शुराचा उचलिला आहे. वाण सतीचे घेतले आहे. हे सांभाळावे असेच धर्मशास्त्र हे गौतमाबाई बोलल्यानंतर मल्हारराव रागास येवून घोडयावर स्वार घेवून जनकोजी शिंदे यांच्या मदतीला गेले.'
असे वाक्य गौतमाबाई बोलल्या हे एका शुराच्या पत्नीला शोभण्यासारखे आहे. भोजराज बारगळ हे पराक्रमी, शुर होते. अशा घरची कन्या लहान पणापासुन क्षत्रिय कार्य पाहत आली होती. त्यामुळे तिने अनेक कठिण प्रसंगात मल्हारराव होळकर यांना आधार दिलेला दिसतो.

गौतमाबाई आणि मल्हारराव होळकर यांना खंडेराव होळकर नावाचा एकुलता एक पुत्र होता.त्याचा जन्म इ.स.१७२३ रोजी झाला होता. खंडेराव या कुलदैवताच्या नावावरुन त्यांचे नाव 'खंडेराव' ठेवले होते. त्यांचे लग्न चौंढी गावचे पाटील माणकोजी शिंदे यांची कन्या अहिल्याबाईशी झाले होते. पुण्यामध्ये पेशवा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

बाजीराव यांच्या आग्रहाने हा समारंभ पार पडला होता. २० मे, १७३७ रोजी खंडेरावांचे लग्न झाले. लग्नाच्या वेळी त्यांचे वय १४ वर्षाचे तर अहिल्याबाईंचे १२ वर्षाचे होते. या लग्नात पेशव्यांकडून भेट ही देण्यात आल्याचे उल्लेख मिळतात. मल्हारराव होळकर यांच्यासोबत खंडेराव हे अनेक मोहिमेमध्ये सहभागी झाले होते. त्यांना वयाच्या १२ वर्षी इ.स. १७३५ मध्ये पेशव्यांकडून इनाम मिळाले होते. रा. मल्हारजी होळकरांचा पुत्र खंडेराव होळकर सितलासीन मयाव अलफ

खंडेराव होळकर यांस जाहागीर मोकासा दिल्याबद्दल पत्रे ही उपलब्ध आहेत.

- सनद मौजे बोरगाव, तालुके पाबळ, प्रांन्त जुन्नर
- सनद मौजे उदवडी, तालुके सांडस, प्रांन्त पुणे येथील मोगलाई बावनी व सरदेशमुखी व सहोत्रा
- कुलाबाबत, कुलकानू दरोबस्त सालमजूकर पासोन (१५ ऑगस्ट, १७३५)

इ.स. १७३५ मध्ये खंडेराव हो सरदेशमुख झाला, म्हणजे त्यावेळी त्यांचे वय १२ वर्ष होते. उत्तरेकडील अनेक मोहीमामध्ये मल्हाररावांसमवेत खंडेराव हे सुध्दा राहत. बाजीरावाच्या उत्तरेकडील मोहीमेत खंडेरावांनी उत्तम कामगिरी बजावल्यामुळे १८ तोळयाचे एक कडे त्यांना पेशव्यांकडून मिळाल्याचे उल्लेख मिळतात. (३१ जुलै, १७३६) इ.स. १७३९ मधील पेशवा कुटूंबातील मस्तानी प्रकरणात मल्हारराव यांना पुण्यात पाचारण केले. त्यावेळी खंडेराव त्यांच्या सोबत होते. त्यांना २६ जानेवारी, १७३९ रोजी पेशव्यांनी शिलेदारीचे काम दिले होते. इ.स. १७४० च्या बुंदी प्रकरणात उमेदसिंगाने मदतीच्या बदल्यात होळकरांना इ.स. १७४४ मध्ये लाखेरीचा परगणा दिला होता. परगणे लाखेरी येथील सनद रावराजा उमेदसिंगजी यांनी खंडेरावांच्या नावे करुन दिली होती. त्याचा उल्लेख मिती आषाढ शुध्द। संवत १८०० अर्थात इ.स.१७४४ असा मिळतो. शिवाय जयपूरच्या वारसा युध्दात उमेंदसिंग व माधोसिंग यांनी आपल्या मदतीसाठी मल्हाररावांना आमंत्रित केले होते. तेव्हा मल्हाररावाने आपला पुत्र खंडेराव यासोबत १००० स्वार देवून माधवसिंगाच्या मदतीला पाठवले. ही मोहीम आपटुन खंडेरावाने चांगली कामगिरी केली होती. पुढे इ.स.१७५३ मध्ये मुगल बादशहा व त्याचा वजीर यांच्यात युध्द झाले. तेव्हा रघूनाथराव यांना उत्तरेत पाठविण्यात आले. त्या सैन्यातही खंडेराव हे अहिल्याबाईसमवेत हजर होते. खंडेराव व अहिल्याबाईंनी अनेक तिर्थयात्रा सोबत केल्या होत्या. सप्टेंबर १७७९ मध्ये उदाबाईच्या लग्नानंतर तिन महिन्यांनी (उदाबाई हया खंडेरावांची बहिण) चैत्र एकादशीच्या सुमारास पंढरपूरची वारी केली होती. पंढरपूरच्या पांडुरंगासाठी खंडेरावांनी ४५ रुपये महानौवदयासाठी दिले होते. ही नेमणूक वार्षिक होती. तसेच अहिल्याबाईंनी रुख्मीणीसाठी सोन्याच्या रमझोन / पैंजण दिले होते. हे पैंजण देवीच्या पायात घालीत जावे अशी सक्त ताकीद तेथील पूजाऱ्याला दिली होती. पंढरपूरच्या यात्रेच्या दिवशी देवी रुख्मीणीच्या पायात हे सोन्याचे पैंजण आजही घातले जातात.

इ.स.१७५४ मध्ये वजीर सफदरजंग व वजीर यांच्या संघर्षात सुरजमल जाटाने सफदरजंगाचा पक्ष घेतला. व मुघल बादशहाशी शत्रुत्व पत्करुन जाटाने दिल्ली लुटली होती. त्यावेळी मल्हारराव होळकरांनी गंगोबा तात्यासह खंडेरावांना जाटाविरुध्द मोहीमेची योजना निश्चित करुन सैन्यासह पाठविले होते.१७ मार्च, १७५४ रोजी कुंभेरीला मोर्चे लावण्याची जबाबदारी खंडेरावांकडे होती.२४ मार्च,१७५४ रोजी खंडेराव होळकर पालखीत बसुन खंदकाचे निरीक्षण करीत असतांना किल्यातुन एकाएकी तोफांचा मारा सुरु झाला. खंडेरावास जांबोऱ्यांची एक गोळी लागली व त्यात त्यांचा मृत्यू झाला. खंडेराव होळकर हे कुंभेरी च्या वेढयात ठार झाल्यावरही गौतमाबाईचे करारीपण, दुः ख बाजुला ठेवून परिस्थितीला सामोरे जाण्याचा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

खंबीरपणा हे इतिहासामध्ये क्वचितच उदाहरण दिसते एकुलता एक पुत्र मारला गेला त्यावर त्या शोक करीत बसल्या नाहीत.'आपले पदरी लौकिक भारी त्यामुळे शोक करणे 'सतीचे वाण घेणाऱ्यास शोभत नाही. असे धिराचे उद्गार गौतमाबाईनी दिले.

भारताचा इतिहास पाहता हा राजे-राजवाडे, पुरुष यांच्या केंद्रीभूत दिसतो, स्त्रीच्या कार्याचा उल्लेख पुरुषाला पाठींबा म्हणुन गणला जातो. तिचे स्वत:चे आस्तीत्व मानले जात नाही. मात्र होळकरांच्या इतिहास पाहता तो अपवाद म्हणावा लागेल. स्वत: गौतमाबाईनी अहिल्याबाईला 'संसारकाम, बाईकाम (?) मध्ये न ढकलता एक प्रसिध्द राज्यकर्ती, कर्तव्यदक्ष स्त्री म्हणून पुढे आणले. त्यात गौतमाबाईचा मोठा हात होता.

गौतमाबाईचा मृत्यू २१ सप्टेंबर, १७६१ रोजी झाला. त्यावेळी त्यांचे वय ६६ वर्षाचे होते. अशी ही सुभेदार पत्नी कर्तव्यदक्ष, कर्तृत्ववान स्त्रीने वीस वर्ष अहिल्याबाईस राज्यकारभाराचे धडे दिलेले दिसतात.

**निष्कर्ष**

ज्या राष्ट्रात स्त्रीच्या कार्याला महत्व दिले जाते,त्या राष्ट्राचा इतिहास गौरवशाली असतो. मल्हारराव होळकर यांना जी खासगी मिळाली ती गौतमाबाई यांच्या नावाने प्राप्त झाली.त्याचा वापर त्यांनी कुटुंबाकरिता न करता समाजकल्याणासाठी केला.त्यातून अनेक ठिकाणी दानधर्म, धर्मशाळा,धार्मिक कार्य, मंदिरे उभारणी,घाट उभारणी इ.कार्य केली गेली. त्यांचा याच कार्याचा वारसा अहिल्यादेवी यांनी चालवला. स्त्रियांच्या हातात कार्यभार दिला तर आर्थिक नियोजन, आणि पैशाचा पुरेपूर वापर स्त्रिया योग्य पद्धतीने करतात. हे प्रमाणाती सिद्ध होते. गौतमाबाईच्या आर्थिक नियोजनाने इंदोरचे होळकर घराणे कायम आर्थिक संपन्न राहिले. एका स्त्रिच्या आर्थिक नियोजनाने संपूर्ण समाजाला फायदा झाला त्यात गौतमाबाई होळकर यांचा त्याग, कर्तव्यपरायण बुद्धीचातुर्य, समर्पण या गुणांचा मिलाफ दिसतो.

**संदर्भग्रंथ**

१. भालेराव दफ्तर, पेशवे पत्रव्यवहार, भालेराव संग्रह खंड १ ते ६१, (हस्तलिखित), श्री,नटनागर शोध संस्थान, सीतामऊ. (मध्यप्रदेश).
२. मल्हारराव होळकर के कूछ ऐतिहासिक हिंदी पत्र, श्री. नटनागर शोध संस्थान, सीतामऊ. (मध्यप्रदेश).
३. होळकर संबंधित पत्र ( हस्तलिखित प्रत), ऐतिहासिक लेख संग्रह ( हिंदी), इ.स. १७६९ ते १८१० पर्यंत, श्री. नटनागर शोध संस्थान, सीतामऊ. (मध्यप्रदेश).
४. आपटे द. वि, "चंद्रचूड दप्तर", प्रकाशक पोतदार द. वा. व मुजूमदार ग.वा., भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, शके १८४२.
५. ठाकुर वा. वा. (संपा.) "होळकरशाहीचा इतिहास" (इ.स. १६९३ -१७९७), होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदौर, १९४४.
६. पारसनीस द. बा. (संपा.), "महेश्वर दरबाराची बातमीपत्रे," भाग १, प्रकाशक तुकाराम जावजी निर्णय छापखाना, मुंबई, १९९१.
७. भागवत अ. ना. (संपा.), "होळकरशाहीच्या इतिहासाची साधने (पत्रव्यवहार)", भाग १ व २, होळकर सरकार पुस्तकमाला, पुस्तक १६ वे, प्रकाशक- द. ब. दांडेकर, इंदोर, १९२४.
८. भागवत अनंत नारायण (संपा.), "होळकरशाहीच्या इतिहासाची साधने", होळकरशाहीतील ऐतिहासीक स्त्रियांचा पत्रव्यवहार, खंड १२, प्रकाशक- द. ब. दांडेकर, इंदोर, १९२४.


Copyright © | JET Network, All Rights Reserved